*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege,org, 9226563052*

---

# घटक 7

# उद्योगसमूहाची नीतिमीमांसा

7.1:उद्योगसमूहाची नीतिमीमांसा
व्यावसायिक नीतिमीमांसेची एक शाखा.
उद्योगसमूहांचा उदय आणि स्वरुप : उद्योगसमूह - एक नैतिक प्रतिनिधी (एजंट)
7.2:उद्योगसमूहाची सामाजिक जबाबदारी : संकुचित आणि व्यापक दृष्टिकोन.
7.3: मालक आणि नोकर यांच्यातील नैतिक समस्या : स्वत:च्या कार्यालयीन पदाला दोष देणे - अवमानजनक बोलणे , व्हीसल ब्लोईंग

---

## उद्योगसमूहाचे नीतिशास्त्र

**अ )** Critically examine the nature of Corporate Ethics.
**'उद्योगसमूहाच्या नीतिशास्त्राच्या स्वरूपाचे चिकीत्सक परीक्षण करा ' चे उत्तर ( 200 शब्द 15 गुण )**

उपयोजित नीतीशास्त्रातील ही गेल्या काही दशकात विकसित झालेली नवी शाखा आहे.म्हणजेच या नीतीशास्त्राची रचना विसाव्या शतकात झाली. उद्योगसमूह या नावातूनच हे स्पष्ट होते की अनेक उद्योगांचा हा समूह आहे. कंपनी किंवा कार्पोरेशन्स या नावाने ओळखले जाणारे हे उदयोगसमूह अमेरिका, ब्रिटन इत्यादी भांडवलदार राष्ट्रात उदय पावले. बहुराष्ट्रीय कंपनी असेही नाव उद्योगसमूहांना आहे.

उद्योगसमूहावर कंपनी या नात्याने कोणती व्यक्तीगत व समाजचा घटक म्णून कोणती सामाजिक जबाबदारी आहे, याचा सर्वांगीण अभ्यास करणारी उपयोजित नीतीशास्त्राची शाखा म्हणजे **उद्योगसमूहाचे नीतिशास्त्र** होय.एखाद्या व्यक्तिवर जशी काही एक नैतिक जबाबदारी असते तशी जबाबदारी एक सामाजिक संस्था म्हणून उद्योगसमूहावर आहे का ? आणि असल्यास कोणती ? या समस्येचा अभ्यास उद्योगसमूहाचे नीतिशास्त्रात होतो.

उद्योगसमूहांनी गेल्या 50 वर्षात सर्व सामान्य माणसाचे सारे जीवन कब्जात घेतले आहे.साबण, निरोध सारख्या किरकोळ वस्तूंपासून विविध खाद्यपदार्थ,वाहने ते घरांपर्यंत सर्व गोष्टीचे उत्पादन या कंपन्या करतात.त्यांची स्वतंत्र अर्थव्यवस्था असते आणि ती अतिशय तगडी असते. अमेरिका ऑन लाईन (AOL), वॉर्नर ब्रदर्स, जनरल इलेक्ट्रीक्स, IBM, AT&T, Exxon Mobile हे काही उद्योगसमूह आहेत.या कंपन्याचा आकार अतिशय अवाढव्य असतो.लाखो कर्मचारी आणि कोट्यावधी ग्राहक असा त्यांचा पसारा असतो.त्यांचे बजेट सुध्दा असेच भयानक असते.उदाहरणार्थ AOL चे बजेट भारताच्या एकूण राष्ट्रीय बजेट इतके असते.वेगळ्या भाषेत युक्रेन, हंगेरी, झेक रिपब्लीक, न्य झीलंड, पेरु आणि पाकिस्तान या देशांच्या एकत्रित बजेट इतकी ही रक्कम होते.

या बहुराष्ट्रीय कंपन्यांनी जनमानसावर व सार्वजनिक जीवनावर खूप मोठा प्रभाव गाजविला आहे. राजकारण, समाजकारण, माध्यमे, खेळ,धर्म,संस्कृती इत्यादी सर्वच क्षेत्रे ताब्यात घेण्याचे आणि प्रत्येकाला आपला ग्राहक बनवून केवळ नफा कमाविण्याचे त्यांचे धोरण असते.जागतिकीकरण हा त्याच खेळचा भाग आहे.जॉन लॉक (1632 ते 1704) आणि ॲडम स्मिथ (15 जून 1723 ते 17 जुलै 1790)या विचारवतांनी मांडलेल्या राजकीय आणि आर्थिक सिध्दान्तात वर्णन केल्यापेक्षा वेगळेच वळण भांडवलशाहीला उद्योगसमूहांमुळे मिळाले.

## उद्योगसमूहाची रचना

सर्वसाधारणपणे उदयोगसमूहाची रचना तीन घटकांनी बनते.



Department of philosophy, Sangamner college, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege,org, 9226563052*

---

**पहिला** भागभांडवलदारांचा
**दुसरा** व्यवस्थापकांचा
**तिसरा** कर्मचाऱ्यांचा.

भागधारक कंपनीला हवा असणारा वित्तपुरवठा करतात, व्यवस्थापक वर्ग व्यवसाय चालविणे, त्यात वाढ करीत राहाणे आणि कर्मचारी वर्ग उत्पादन करणे ही कामे करतात.अतिशय उत्तम म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कंपनीत व्यवस्थापक वर्गावर खूप मोठी जबाबदारी असते.व्यवस्थापक वर्गाची रचना अतिशय काटेकोर, श्रेणिबध्द आणि जास्तीत जास्त वस्तुनिष्ठ असते. ती कंपनीचे व्यवसायाचे धोरण तयार करते, कामकाजाचा आराखडा बनविते, काम आणि जबाबदारीनुसार कर्मचारी वर्गाची औपचारिक रचना करते. व्यवस्थापकांची कोणतीही कृती नेहमीच कंपनीचा फायदा होत राहिल, अशी असते.




## उद्योगसमूहाच्या नीतिशास्त्रातील समस्या

कंपन्या केवळ नफा मिळविणे, हे उद्दिष्ट राखतात. पण हा दृष्टिकोन एकांगी आहे. कंपनी ही सामाजिक संस्था असते.तिच्यावर काही सामाजिक जबाबदारीही असते.या जबाबदारीस 'कार्पोरेट सोशल रिस्पॉन्सीबीलीटी ' (सीएसआर) म्हणतात.नैतिकता नेहमी सामाजिक संदर्भातच युक्त ठरत असते. त्यामुळे उद्योगसमूहाची नीतिविषयक भूमिका कोणती ? असा प्रश्न निर्माण होते. उद्योगसमूहाच्या नीतिशास्त्रात मुख्यत: चार मुद्दयांचा अभ्यास केला जातो. ते पुढील प्रमाणे :

1. उद्योगसमूहांवर काही सामाजिक जबाबदारी असते का ? असल्यास तिचे स्वरूप काय ?
2. या जबाबदाऱ्या कोणत्या आहेत ? याबाबत दोन दृष्टिकोनांची चर्चा केली जाते. पहिला संकुचित दृष्टिकोन आणि दुसरा व्यापक दृष्टिकोन. यामध्ये वाद आहेत.**संकुचित दृष्टिकोन** म्हणजे कंपनीची जबाबदारी फक्त भागभांडवलदारांपुरतीच असून त्यांचा जास्तीत जास्त फायदा कसा होईल, तेच कंपनीने पाहिले पाहिजे.हा दृष्टिकोन मिल्टन फ्रिडमन या अमेरिकन अर्थशास्त्रज्ञाने मांडला.

**Milton Friedman**
(July 31, 1912 – November 16, 2006)
an American economist, statistician, and author who taught at the University of Chicago for more than three decades.
Recipient of the Nobel Memorial Prize in Economic Sciences




**व्यापक दृष्टिकोन** म्हणजे उदयोगसमूह ही कायदेशीररित्या निर्माण झालेली सेवा व वस्तू पुरवठादार संस्था असल्याने तिच्यावर निश्चितच काही जबाबदारी असते, असे सांगणारा युक्तिवाद होय.कंपनी ही समाजातील एक मोठी आर्थिक ताकद बनते.आर्थिकतेशी राजकीय सत्ता जोडलेली असते.त्यामुळे समाज कल्याण करणे हे सत्तेचा हेतू असतो.म्हणून कंपन्यांवर मोठी नैतिक जबाबदारी असते.हा दृष्टिकोन कीथ डेव्हीस, मेलवीन अन्शेन यांनी मांडला.

3. या संबंधात **चार युक्तीवाद** आहेत : अदृश्य हात युक्तीवाद, शासनमुक्त व्यापार युक्तीवाद, अकार्यक्षम रक्षक युक्तीवाद आणि समाजाचे वस्तुकरण युक्तीवाद.
4. उद्योगसमूहांनी कोणती नैतिक तत्त्वे पाळावीत, कोणती आचारसंहिता आणावी यासाठी उद्योगसमूहांमध्ये नैतिक समिती स्थापन करणे महत्वाचे ठरते.कंपनीत नैतिकतेच्या स्थापनेचे महत्व आणि ती स्थापना कशी करता येईल, य दिशेने विचार करणे, कृती करणे ही कामे नैतिक समिती करते.यासाठी प्रत्येक कंपनीत नैतिक समिती ' स्थापन करणे अनिवार्य ठरते.

**ब)** Critically examine the nature of Corporation as moral agent

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege,org, 9226563052*

---

**'नीतीचा वाहक घटक म्हणून उद्योगसमूहाच्या स्वरूपाचे चिकीत्सक परीक्षण करा ' चे उत्तर (200 शब्द 15 गुण)**

उद्योगसमूहांवर कोणती नैतिक जबाबदारी असते ? ही समस्या 19 व्या शतकात उभी राहिली. युरोप - पाश्चात्य राष्ट्रातील समाज सुधारक मंडळीनी उद्योगसमूहांची रचना व उद्दिष्टे याविषयी प्रश्न उपस्थित केले तेंव्हा नीतीविषयक मुद्दा आला.उद्योगसमूह ही मुळात लोकांची संघटना असून संघटना करणाऱ्या लोकांवर नैतिक जबाबदारी असते ,अशी मांडणी त्यांनी केली.उद्योगसमूहाची रचना व स्थापना देशातील कायद्याच्या आधारेच होत असते आणि कायदा हा नेहमी रुढी, परंपरा व नीती यांच्या आधारे रचला जातो.त्यामुळे अशा कायद्याच्या आधारे रचला गेलेला उद्योगसमूह सुध्दा समाजाविषयी नैतिक जबाबदारी पाळणारा नीतीचा वाहक घटक असतो, असे या सुधारकांचे म्हणणे होते.या बाबत काही मुद्दे असे :



1.उद्योगसमूह ही कायदेशीर संस्था आहे.
2.व्यक्ती आणिउद्योगसमूह हे समान नीतीचे वाहक घटक आहेत.
3.उद्योगसमूह ही निर्माण केली गेलेली ' कृत्रिम व्यक्ती ' असते.
4.नैतिक जबाबदारी या संकल्पनेला विशिष्ट तीन अर्थ असतात :

(1) केलेल्या कृतीबद्दल जबाबदार धरणे.
(2)एखादा माणूस करीत असलेल्या सामाजिक भूमिकेतून कोणती विशेष काळजीवाहक, कल्याणकारी कृती निष्पन्न होते तिची जबाबदारी घेणे.
(3)स्वत:हून नैतिक अथवा बौध्दिक निर्णय घेणे

**क)** The concept of Bribing as ethical issue in Corporate Ethics
**उद्योगसमूहाच्या नीतीशास्त्रातील लाचखोरीची संकल्पना एक नैतिक समस्या चे उत्तर (100 शब्द 10 गुण)**

लाचखोरी ही आर्थिक क्षेत्रातील सर्वात जुनी सामाजिक स्वरुपाची समस्या आहे.तिला फार पूर्वी राजेशाहीच्या कालात खंडणी हे नाव होते.गेल्या काही वर्षात गुन्हेगारीच्या क्षेत्रात पुन्हा खंडणी सुरु झाली. हुकूमशाही, राजेशाही, लष्करशाही असो अथवा प्रगत लोकशाही असो लाचखोरी असतेच, असे दिसते.साध्या पान दुकानवाल्यापासून ते प्रचंड मोठ्या उद्योगपतीला आणि अर्थातच सामान्य माणसाला लाचखोरीच्या अनैतिक रोगाला बळी पडावे लागते.

## लाचेची व्याख्या

**लाच** म्हणजे एखाद्याला ज्या कामासाठी नेमलेले असते अथवा करार केलेला असतो त्या व्यक्तिने ते काम सोडून त्या विरुध्द काम करण्यासाठी घेतलेला मोबदला होय. बहुधा लाच रोख रक्कम या रुपात असते. पण काही वेळेस तिचे स्वरुप बदलते.हे स्वरुप म्हणजे '**किकबॅक '.**

### 'किकबॅक'

संबंधितास रोख रक्कम न देता वेगवेगळ्या भेटवस्तू देणे.शिवाय मद्यपार्टी,नाचगाणे,सहली इत्यादी विविध प्रकारचे मनोरंजन अथवा विशेष आदरातिथ्य असलेल्या वागणूकीचा स्वीकार करणे ही सुध्दा लाचेची वेगवेगळी रुपे आहेत.या सर्वांना **'किकबॅक'** म्हणतात.गेल्या काही वर्षात लाचखोरीला 'कमिशन' , 'कट् ' अशीही नावे मिळाली आहेत.वकीली व वैद्यकीय व्यवसायातही कमिशन प्रकाराने अतिक्रमण केले आहे.

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत आणि समाजव्यवस्थेतही लाचखोरी असते.भांडवलशाहीचा हिस्सा म्हणून विसाव्या शतकात कार्पोरेटक्षेत्र उदयाला आले.या क्षेत्रातील व्यवस्थापन व व्यवस्थापक वर्गाने कंपनीसाठी केवळ

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege,org, 9226563052*


नफा, फायदा, पैसा हेच उद्दिष्ट ठेवल्याने सरकारी नोकरशाही, मंत्री इत्यादी शासकीय व्यवस्थेकडून विविध प्रकारचे परवाने आणि सवलती मिळविण्यासाठी लाचखोरीचा मार्ग स्वीकारला.

उद्योगसमूहांना लाचखोरीपासून रोखण्याकरिता 1977 साली अमेरिकेत फॉरेन करप्ट प्रॅक्टिस ॲक्ट हा कायदा करण्यात आला.तिचा अर्थात फार काही फायदा झाला नाही.खुद्द अमेरिका हीच जगातील अनेक देशांना विविध प्रकारची लाच देवून केवळ तिचाच फायदा पाहते.

## सामाजिक व नैतिक रोग

लाचखोरीचा रोग समाजातील व्यक्ती, व्यावसायिक स्पर्धक, सामाजिक, राजकीय संस्थां आणि मुक्त बाजार व्यवस्थेला आर्थिक जखम करते.खुली स्पर्धा बंद पडून बाजर व्यवस्था रोगट होते.लाचखोरी कायदा मोडायला शिकविते. या सर्व प्रकारामधील नैतिकतेचा मुद्दा असा की कुणीही कुठेही कुणालाही कशाही स्वरुपात लाच दिली तरी त्याचा फटका मुख्यत: सामान्य माणसालाच होते. हा फटका प्रत्यक्ष असेल अथवा अप्रत्यक्ष असेल. पण नुकसान नेहमीच निराधार सामान्य माणसाचेच असते.

**ड)** Briefly explain " Whistle Blowing " as an ethical issues in Corporate Ethics.

**' उद्योगसमूहाच्या नीतीशास्त्रातील '' व्हिसल ब्लोईंग '' ही नीतीशास्त्रीय समस्या थोडक्यात स्पष्ट करा' चे उत्तर (50 शब्द 5 गुण)**

गेल्या दोन दशकात उद्योगसमूह क्षेत्रातील नैतिक समस्यांनी उग्र रुप धारण केले.या समस्या सोडविण्यासाठी अनेक उपाय शोधण्यात आले.त्यातून एका नव्या संकल्पनेचा उदया झाला. ती म्हणजे **व्हिसल ब्लोईंग** होय. तिचा शब्दश: अर्थ शिट्टी मारणे होय. पण या संज्ञेचे योग्य भाषांतर भाषांतर दवंडी अथवा शंखध्वनी असे करता येईल !

## व्हिसल ब्लोईंगची व्याख्या

प्रोफेसर नॉर्मन बोवी यांनी व्हिसल ब्लोईंगची **व्याख्या** पुढीलप्रमाणे केली आहे : खासगी किंवा सार्वजनिक , नफा अथवा ना नफा तत्त्वावर चालणारी कोणत्याही संस्थेतील कर्मचाऱ्याने किंवा अधिकाऱ्याने कंपनीकडून अथवा मालककडून त्याच्यावर अनैतिक अथवा बेकायदेशीर कृती करण्याची जबरदस्ती होत असल्याची माहिती जनतेला जाहिरपणे देणे म्हणजे व्हिसल ब्लोईंग होय.

**Norman E. Bowie**
(born 1942)
a professor of strategic management and of philosophy.
Teaches in both of those departments at the University of Minnesota



बोवीच्या मते एखादी कृती व्हिसल ब्लोईंग होण्यासाठी त्या कृतीमागे मुख्य तीन बाबी असल्या पाहिजेत.
(1) संस्थेची कर्मचाऱ्यावर जबरदस्ती केली जाणारी कृती गरज नसताना इतरांना त्रासदायक ठरणारी आहे
(2) ती मानवी हक्कांचा भंग करणारी आहे.
(3) ती अनैतिक अथवा बेकायदेशीर कृती खुद्द संस्थेच्या सुध्दा हिताची नाही आणि संस्थेच्या आचारसंहितेच्या विरुध्द आहे. म्हणूनच ती संस्थेने ती दडवून ठेवली आहे.

आता, मालकाच्या किंवा कंपनीच्या विरोधात जाण्यासारखे हे कृत्य होईल.अशी कृती नैतिक कशी ठरु शकते ? बोवीच्या मते व्हिसल ब्लोईंग कृती नैतिक ठरु शकते.त्याचे काही निकष आहेत.ते असे :

**निकष :**

Department of Philosophy, Sangamner College

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege,org, 9226563052*

---

1. संबंधित कर्मचाऱ्याने तक्रार घेवून आधी मालक, संचालक किंवा तक्रार निवारण यंत्रणेशी संपर्क करावा.
2. तक्रारीचा पुरेसा पुरावा असला पाहिजे.
3. स्वत:ला होणाऱ्या धोक्याचे विश्लेषण केले पाहिजे.
4. कर्मचाऱ्यास किमान यशाची संधीची खात्री असावी.

थोडक्यात मालक किंवा कंपनी करीत असलेल्या अनैतिक व बेकायदेशीर समाजविरोधी कृत्याबद्दल कंपनीतील कर्मचाऱ्याने जनतेकडे जाहीरपणे माहिती नेणे म्हणजे **व्हिसल ब्लोईंग** होय. शंखध्वनी करण्यामागे संबंधित व्यक्तीचा हेतू कंपनीला, मालकाला आणि समाजाला अनैतिकतेपासून होणाऱ्या नुकसानापासून वाचविणे, हाच असला पाहिजे. तसे असेल तरच ती कृती नैतिक ठरते अन्यथा नाही.

भारतीय परंपरेत वर्णजाती लिंगभेदाच्या विषमतेच्या विरोधात म.फुले, आगरकर, डॉ.आंबेडकर एका अर्थाने असा शंखध्वनी केला होता.त्यांना यश मिळाले. त्या आधी महाभारत काली श्रीकृष्ण यादवाने रणांगणात कौरव - पांडव महायुध्द प्रसंगी शंखध्वनी केला होता !



Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner